# प्रेषितांची कृत्ये, सेवाकार्यासाठीचे मार्गदर्शन

मुलांना शिकविणाऱ्यांनी A1b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू येशूची साक्ष देण्यासाठी तू प्रे. कृ. 1:8 ह्या वचनात अभिवचन दिल्याप्रमाणे आम्हाला पवित्र आत्म्याचे सामर्थ्य दे.''

## 1. देवाच्या वचनाने तुमच्या अंतःकरणाची व मनाची तयारी करा.

चारपैकी एक शुभवर्तमान लिहिणाऱ्या लूकाने मंडळीची सुरुवात यरूशलेममध्ये होऊन रोमन साम्राज्याच्या द्वारे यहूदी व विदेशी लोकांमध्ये आशिया आफ्रिका आणि युरोपमध्ये तिचा विस्तार कसा झाला हे प्रेषितांची कृत्ये यामध्ये नमूद करून ठेविले आहे.




**वाचा प्रे. कृ.** 1 पाहा वचने 1-8 मध्ये देवाच्या राज्याच्या विस्तारासाठी आमच्या सामर्थ्याचे साधन.

**पाहा प्रे. कृ.** 1:8 मध्ये त्यांनी पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने येशूच्या नावाची घोषणा चार ठिकाणी केली.

1) यरूशलेम म्हणजे आपण राहतो तो समाज, तुमचे ''यरूशलेम'' कोणते आहे?
2) यहूदीया म्हणजे समान संस्कृतीचे जवळपास राहणारे लोक, तुमचे ''यहूदीया'' कोठे आहे?
3) शोमरोन म्हणजे सारख्या संस्कृतीचे जवळच राहणारे लोक, तुमचे ''शोमरोनी'' लोक कोण आहेत?
4) पृथ्वीच्या शेवटापर्यंत म्हणजे दुर्लक्षित दूरवर राहणारे लोक, त्यांना सुवार्ता समजावी अशी देवाची इच्छा आहे.

**पाहा प्रे. कृ.** 1:14 मध्ये येशूने अभिवचन दिलेल्या पवित्र आत्म्याची वाट पहात असताना शिष्य काय करीत होते.

**वाचा प्रे. कृ.** 2 वाट पाहणारे शिष्य पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले तेव्हा काय घडले ते पाहा. त्यांना एक चित्तथरारक अनुभव मिळावा यासाठी की साक्ष देण्यासाठी साहाय्य व्हावे म्हणूने ते पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले का?

- पाहा **प्रे. कृ.** 2:24-32 मध्ये पेत्राच्या सामर्थ्यशाली संदेशात येशूचे मरण याशिवाय प्रामुख्याने कशावर भर दिला आहे.
- पाहा **प्रे. कृ.** 2:37-47 मध्ये येशूच्या आज्ञाचे पालन करतांना शिष्यांनी एकदम सात गोष्टी केल्या.

प्रेषितांची कृत्ये यातील इतर अध्यायांमध्ये पाहा:

अध्याय 3: आम्ही देवाला येशूच्या नावाने हाक मारतो तेव्हा त्याच्याकडून आम्ही कशाची अपेक्षा करतो.

अध्याय 4: प्रतिकूल अधिकारी आम्हाला धमकावतात तेव्हा आम्ही काय करावे.

अध्याय 5: देवाशी खोटे बोलणाऱ्या लोकांचे त्याने काय केले.

अध्याय 6: गरजू लोकांची काळजी घेण्यासाठी मंडळीने काय केले.

अध्याय 7: स्तेफनाने इस्राएलाच्या इतिहासाचा आढावा कशा प्रकारे घेतला, त्यामुळे पुढाऱ्यांना राग येऊन त्यांनी काय केले.

अध्याय 8: शोमरोनात फिलिप्पाने देवाचे कार्य कसे सुरू केले आणि शिमोनाने शिष्यांना पैसे का देऊ केले.

अध्याय 9: देवाने ख्रिस्ती लोकांच्या अत्यंत वाईट अशा मानवी शत्रूला पश्चात्ताप करण्यास कसे साहाय्य केले.

अध्याय 10-11: विदेशी लोकांनाही देवाचा पवित्र आत्मा मिळाला हे त्याने विश्वासणाऱ्या यहूदी लोकांना कसे पटविले.

अध्याय 12: हेरोद राजाने याकोबाचे काय केले आणि पेत्राची हेरोदापासून सुटका कशी झाली

अध्याय 13-14: पौलाला दूरवरच्या देशांत कोणी पाठविले, त्याच्याबरोबर कोण कोण गेले आणि त्यांनी विश्वासणाऱ्यांनी व्यवस्था कशी केली.

अध्याय 15: जुने यहूदी नियमशास्त्र न पाळणाऱ्या विदेशी लोकांचा स्वीकार करण्यास देवाने यहूदी लोकांना कसे साहाय्य केले.

अध्याय 16: युरोपमध्ये फिलिप्पै येथे पहिली मंडळी कशी सुरू झाली आणि पौलाने त्याच्या तुंरूगाधिकाऱ्याला कोणते अभिवचन दिले.

अध्याय 17: यहूदी लोकांनी पौलाचा संदेश निरनिराळ्या मार्गांनी स्वीकारला.

अध्याय 18: पौलाने करिंथमध्ये स्वत:चा खर्च स्वत: कसा चालविला आणि त्याच्या सहकाऱ्यांनी अपुल्लोसाठी काय केले.

अध्याय 19-20: इफिसमधील अनेक प्रसंग, दंगल कशामुळे झाली आणि त्याने 'लांडग्याबद्दल' काय इशारा दिला.

अध्याय 21-28: पौलाला यरूशलेममध्ये तुरूंगात का टाकले, त्याची चौकशी आणि रोमच्या वाटेवर काय घडले.

## 2. तुमची मंडळी प्रेषितांचा आदर्श ठेवण्यासाठी पुढील आठवड्यात काय करणार ते ठरवा

- विश्वासणाऱ्यांना ख्रिस्ताची ओळख नसणाऱ्यांकडे जाऊन त्याची साक्ष देता यावी यासाठी योजना आखा.
- हे त्यांनी प्रेषितांप्रमाणे प्रार्थना पूर्वक व पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने करावे यासाठी त्यांना मदत करण्याची योजना आखा.
- तुमचे 'यहूदीया' 'शोमरोन' व 'यरूशलेम' येथे काम करण्यासाठी दीर्घकालीन योजना आखा.

## 3. सहकाऱ्यांशी येणाऱ्या उपासना सभेसाठी चर्चा करा.

सध्याच्या गरजा व स्थानिक रिवाजांनुसार कार्यक्रम निवडा.

साक्ष देण्याची तयारी करा. उपासनेच्या वेळी, विश्वासणाऱ्यांना येशूसाठी प्रभावी साक्ष देण्यास तुम्ही तयार कराल. त्यांना तुम्ही किंवा सहाय्यक प्रे. कृ. 1:8 हे वचन वाचताना दोन गोष्टीकडे लक्ष देण्यास सांगा.

- पहिली गोष्ट पुनरूत्थित ख्रिस्तविषयी इतरांना सांगण्यासाठी आम्हाला कोणाकडून सामर्थ्य मिळते?
- दूसरी गोष्ट पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने प्रेषित कोणत्या चार ठिकाणी साक्ष देण्यास गेले?
- वाचून झाल्यावर, लोकांना ह्या प्रश्नांची उत्तरे विचारा आणि शक्य असल्यास त्यावर चर्चा करा.

प्रेषितांनी चार ठिकाणी जाऊन येशूसाठी साक्ष दिली, आमच्यासाठी ही चार ठिकाणे कोणती आहेत? ते विचारा (वर भाग 1 मध्ये उत्तरे दिली आहेत.) मग तुमच्या ''यहूदीया'' किंवा ''शोमरोन'' मधील येशूची ओळख नसलेल्या लोकांसाठी प्रार्थना करा.

मुलांनी तयारी केलेली नाटिका, कविता व प्रश्न सादर करण्याची त्यांना संधी द्या.

पाठ करा प्रे. कृ. 1:8

लोकांच्या आठवडाभरात भेटी घेऊन त्यांना आपल्या प्रभू येशूविषयी सांगण्यासाठी तुम्ही सहकाऱ्यांच्या मदतीने तयार केलेल्या योजना सांगा. यासाठी योग्य ती उत्तम तयारी करा व्यवस्था करा. विश्वासणाऱ्यांनी ते कोणाची भेट घेणार आहेत याविषयी चर्चा करावी.

येशूच्या मुख्य आज्ञाचे पालन करण्यासाठी नव्या शिष्यांना मदत करा तुम्ही किंवा मदतनीसाने प्रे. कृ. 2:37-47 हा शास्त्रभाग वाचून दाखववावा. पण तो वाचण्यापूर्वी विश्वासणाऱ्यांना यरूशलेमेमधील पालट झालेल्या 3,000 जणांनी येशूच्या आज्ञाचे पालन करण्यासाठी काय केले ते लक्षपूर्वक ऐकण्यास सांगा. तुमचे मदतनीस पेंटेकॉस्टनंतर येशूच्या आज्ञांचे पालन करण्यासाठी नवीन विश्वासणाऱ्यांनी केलेल्या सात गोष्टी मूकाभिनयाने सादर करणार आहेत, असे सांगा. ह्या गोष्टी कोणत्या ते विश्वासणाऱ्यांना ओळखण्यास सांगा.

1) पश्चात्ताप दोन मदतनीसांना मूकाभिनयाने पश्चात्तापाचे वर्णन करण्यासाठी तयार करा.

- खोलीच्या एका बाजूला, एक जण सैतानासारखे तुच्छतेने विकट हास्य करीत हातांची हालचाल करून दुसऱ्याला स्वत:कडे बोलावितो.
- दुसरा हळूच, जणूकाही कोणी बघेल ह्या भीतीने दबकत दबकत इकडे तिकडे पाहात त्याच्याकडे जातो. त्याच्या जवळ पोहचणार इतक्यात तो थांबतो, आपले हात हृदयाजवळ नेऊन छोटीशी प्रार्थना केल्यासारखे करतो मग तो मागे फिरून दुसऱ्या वाटेने निघून जातो.
- अभिनयातून काय सांगितले ते लोकांना विचारा. पश्चात्ताप म्हणजे आमचे अंत:करण पालटले आहे, मागे फिरून वेगळ्या दिशेने जाणे म्हणजे पापाकडे नाही तर पापापासून दूर जाणे होय.

2) बाप्तिस्मा: एक मदतनीस दुसऱ्याला बाप्तिस्मा देत असल्याचा अभिनय करतो (लोकांना ओळखू द्या)

3) देवाचे वचन शिकणे व शिकविणे: एकजण प्रत्येकाला दिसेल अशा रीतीने पवित्र शास्त्र उघडून उंच धरतो. दुसऱ्याला समजावून सांगत असल्यासारखे पानावरील शब्दांवर बोट ठेवा (लोकांना ओळखू द्या.)

4) सहभागिता (एकमेकांवर प्रेम करणे) एक मदतनीस दुसऱ्या मदतनीसाला अलिंगन देतो (मदतनीस दोघेही पुरुष असावेत किंवा स्त्रिया असाव्यात) अथवा तुमच्या संस्कृतीत वेगळ्या प्रकारे प्रेम व्यक्त करीत असतील तर ते दाखवा. (लोकांना ओळखू द्या.)

5) भाकरी मोडणे (प्रभुभोजन): एक मदतनीस जणू काही तो दुसऱ्याला भाकरी व प्याला देत आहे असा अभिनय करावा. दुसऱ्याने भाकरी व प्याल्यातून सेवन केल्याचा अभिनय करावा. (लोकांना ओळखू द्या)

6) प्रार्थना: दोघे मदतनीस शांतपणे प्रार्थना करण्यास बसल्याचा अभिनय करतात (लोकांना ओळखू द्या.)

7) दान देणे: एक मदतनीस दुसऱ्याला काही तरी देत असल्याचा अभिनय करतो आणि दुसरा एकही शब्द न बोलता ते अगदी कृतज्ञ भावनेने स्वीकारतो. (लोकांना ओळखू द्या.)

प्रेषितांनी काय केले ते स्पष्ट करून सांगा. प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात तुम्ही वाचलेले एक वा अनेक प्रसंग निवडून तुमच्या मंडळीला सांगा किंवा नाट्यीकरण करून दाखवा ह्या नाट्यीकरणासाठी प्रौढ व मूले अशा दोघांनीही मदत केली तर ते अधिक प्रभावी होईल मग विश्वासणाऱ्यांना यातून शिकण्यास सांगा. यातून त्यांनी काय करण्याची योजना केली आहे ते विचारा.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी प्रे.कृ. 20:7 वाचा प्रेषितांची कृत्ये यामधील विश्वासणारे प्रभुभोजनाचा विधी साजरा करण्यासाठी येशूचे पुनरूत्थान झाले अशा आठवड्याच्या पहिल्या दिवशी एकत्र जमत.

दोन किंवा तीन जणांचे गट करून प्रार्थना आणि एकमेकांना मदत करा. साक्ष देण्याच्या आणि एकमेकांना प्रोत्साहन देण्याच्या योजनांना मंजुरी द्या.

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net